**Bullet trains BKC Station will have state of art amenities.**

# बुलेट ट्रेनचे बीकेसी स्थानक होणार अत्याधुनिक



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई ते अहमदाबाद मार्गावर धावणार्या बुलेट ट्रेनचे सुरुवातीचे स्थानक वांद्रे कुर्ला संकुल (बीकेसी) अत्याधुनिक असणार आहे. या स्थानकात शून्य सांडपाणी सोडण्याची यंत्रणा सज्ज असणार आहे. तसेच स्थानकात नैसर्गिक प्रकाशाकरिता स्कायलाईटची तरतूद करण्यात येणार आहे. ही संपूर्ण रचना १.१५ लाख टन स्टीलच्या आधारे तयार केली जाणार आहे.

बुलेट ट्रेनच्या मार्गात बीकेसी हे एकमेव भुयारी रेल्वे स्थानक असणार आहे. हे स्थानक ४.९० हेक्टर जागेत उभारले जाणार असून सहा प्लॅटफॉर्म जमिनीपासून २४ मीटर खोल असणार आहेत.

प्रत्येक प्लॅटफॉर्मची लांबी ४१५ मीटर असेल. यावरून १६ डब्यांची बुलेट ट्रेन धावणार आहे. तसेच स्थानकाची इमारत तीन मजली असून त्यात प्लॅटफॉर्म, कॉन्कोर आणि सर्व्हिस फ्लोअरचा समावेश आहे. याशिवाय प्रवाशांकरीता आधुनिक सुरक्षा प्रणाली, वेटींग रूम, माहीती केंद्, सीसीटीव्ही केंद्र अशा विविध सुविधा असतील.

या कामांसाठी सुमारे १ हजार ८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. अहमदाबाद आणि मुंबई दरम्यानच्या हायस्पीड रेल्वे मार्गावर ३२० किमी प्रतितास वेगाने बुलेट ट्रेन धावणार आहे. या मार्गावर १२ स्थानके असतील.

बीकेसी स्थानकाच्या बांधकामासाठी मोठ्या कंपन्या उत्सुक आहेत. स्थानकाचा आराखडा व बांधकामासाठी नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने तांत्रिक निविदा मागविल्या होत्या. त्यात लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो, जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लिमिटेड, फकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि एमईआयएल-एचसीसी (संयुक्त) या कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. तांत्रिक निविदांचे मूल्यमापन पूर्ण झाल्यानंतर पात्र बोलीदारासाठी आर्थिक निविदाही खुली करण्यात येणार आहे.